1 दि.26 जुलै 2021 "प्रकल्प लेखन कार्यशाळा संपन्न

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी व एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय बिडकीन यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी, मराठी व इंग्रजी विभागांतर्गत प्रकल्प लेखन कार्यशाळेचे आभासी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळे प्रसंगी उद्घाटक डॉ.नितीन आहेर प्रमुख मार्गदर्शक डॉ. मजीद शेख व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विश्वास कदम यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ.नितीन आहेर यांनी प्रकल्प ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. असल्याचे प्रतिपादित करून कार्यशाळेचे उद्घाटन केले. डॉ. मजीद शेख यांनी हिंदी साहित्याच्या अनुषंगाने साहित्याचे अध्ययन व अध्यापन यावर प्रकाश टाकत. साहित्याची परंपरा समजून घेऊन साहित्य आणि समाजाचा अनुबंध सांगत रामचंद्र शुक्ल यांनी तुलसीदासांच्या साहित्याच्या अनुषंगाने सुरुवातीला संशोधनाची परंपरा असल्याचे सांगत, संशोधनाची दृष्टी व समज येणे खूप गरजेचा असल्याचे सांगून भाषेचा विद्यार्थी हा चिकित्सक दृष्टी असलेला, तंत्रस्नेही व बहुभाषिक असणे ही काळाची गरज असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना संशोधनाविषयी चे मार्गदर्शन केले. प्राचार्य विश्वास कदम यांनी ही अध्यक्षीय समारोपात संशोधन ही काळाची गरज असल्याचे सांगत पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुखत्यार शेख, प्रास्ताविक डॉ. अर्चना काटकर प्रमुख पाहुण्यांचा परिचय मोहसीन शेख व आभार डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दोन्ही महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने आभासी स्वरुपात उपस्थिती दर्शवून कार्यक्रम यशस्वी केला.